महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.

Web: www.dhepune.gov.in E-mail : prash.dhepune@gov.in

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११५३

**किमंत रुपये एक हजार फक्त**

# निविदा सूचना

आर्थिक वर्ष २०१६-१७ या कालावधी करिता शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण या कार्यालयास कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य याचा संपुर्ण वर्षभर मागणीप्रमाणे पुरवठा करण्याकरिताचा करार करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. कार्यालयास आवश्यक असलेली स्टेशनरी व साहित्य यांची यादी सोबत च्या प्रपत्र क मध्ये नमुद केलेली आहे.

निविदा भरुन सादर करण्याचा **अंतिम दिनांक २२ जुलै २०१६ रोजी सांय. ५.३० वा. पर्यत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-०१ येथे सादर करण्यात यावेत.**

कार्यालयास प्राप्त निविदा या दिनांक **२५ जुलै २०१६ रोजी दु. ३.०० वाजता** फोडण्यात येतील. निविदा फोडतांना निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील.

एखादी निविदा स्विकारण्याचा व नाकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार उच्च शिक्षण संचालनालय राखून ठेवत आहे.

निविदेसोबत जोडण्यात येणारे कागदपत्रे / प्रमाणपत्र इ. सांक्षाकीत करुन जोडणे आवश्यक राहिल. तांत्रिक ( Technical Bid ) फॉर्म मधील बाबीची छानणी केल्यानंतर पात्र निविदा धारकांच्या अतांत्रिक ( Financial Bid ) लिफाफा फोडण्यात येईल.

निविदेची किंमत रु. १०००/- ( रुपये एक हजार फक्त) राहिल. निविदा फॉर्मची किंमत कार्यालयातील लेखा-१ शाखेत जमा करुन निविदा घेण्यात याव्यात.

ज्या निविदाधारकास / पुरवठादारास संचालनालयाचे सदरचे काम देण्याचे निश्चित करण्यात येईल त्यास पुर्ण कालावधीमध्ये दरकरार पत्रकामध्ये नमुद केलेल्या दरानुसारच स्टेशनरी व साहित्यांचा पुरवठा करणे बंधनकारक राहिल. कोणत्याहि परिस्थितीमध्ये / कोणत्याही कारणाने निविदेमध्ये नमुद केलेल्या दरापेक्षा जास्तीचा दराने सेवा उपलब्ध करुन देता येणार नाही.

ज्या निविदाधारकास / पुरवठादारास संचालनालयाचे सदरचे काम देण्याचे निश्चित करण्यात येईल त्यास रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर वार्षिक करार ७ दिवसाच्या आत करावा लागेल.

**निविदा सोबत जोडावयाची कागदपत्रे**

आयकर नोंदणी प्रमाणपत्र, सेवाकर (Service Tax) प्रमाणपत्र, व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र, आस्थापना व दुकाने अधिनियम लायन्सेस प्रमाणपत्र, आयकर विवरणपत्र भरल्याचे प्रमाणपत्र, मागील तीन वर्षातील आयकर विवरणपत्राच्या प्रती, शासकीय कार्यालयामध्ये स्टेशनरी व साहित्यांचा पुरवठा करीत असल्याचा तीन वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र व सदरची सेवा समाधानकारक पुरविल्याची संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र. सदरची कागदपत्रे ही सांक्षाकीत करुनच जोडण्यात यावीत.

( डॉ. वि. रा. मोरे )
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१